ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालय शाखेतील अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित) पदाची दि. ०१/०१/२०२६ रोजीची तात्पुरती (Provisional) ज्येष्ठतासूची.

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

**शासन परिपत्रक क्र. ज्येष्ठता- २०२२/प्र.क्र. १२९/ ऊर्जा-१**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ६ मे, २०२६.

**वाचा:** १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही- २०१६/प्र.क्र.२८१/बारा, दि. २१.०६.२०२१.

२) शासन परिपत्रक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र. ज्येष्ठता- २०२२/प्र.क्र.१२९/ ऊर्जा-१, दि. ०४.०७.२०२५.

**प्रस्तावना:-**

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालयातंर्गत कार्यरत असलेल्या अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांची दि. ०१.०१.२०२५ रोजीची अंतिम ज्येष्ठता सूची संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित) या संवर्गातील अधिकाऱ्यांची दि. ०१.०१.२०२६ रोजीची तात्पुरती ज्येष्ठतासूची सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट- अ"** नुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.

२. शासन आदेश, दि.११.०९.२०२५ अन्वये विद्युत निरीक्षक, गट-अ (राजपत्रित) या संवर्गातून एका अधिकाऱ्यांची तात्पुरत्या स्वरुपात अधीक्षक अभियंता या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने मुख्य विद्युत निरीक्षक यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक हे त्यासोबतच्या ज्येष्ठतासूचीत समाविष्ठ असलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. या ज्येष्ठतासूचीतील माहिती सेवापुस्तक व अन्य उपलब्ध अभिलेखावरून तपासून बरोबर असल्याचे प्रमाणित करावे. या ज्येष्ठतासूचीत काही वास्तविक चुका अथवा त्रुटी राहिल्या असतील तर त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांचे निवेदन विहित मार्गाने हे परिपत्रक प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत शासनास सादर करावे. त्यानंतर प्राप्त झालेल्या निवेदनांचा विचार करण्यात येणार नाही.

३. मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ वर दिलेल्या न्यायनिर्णयानुसार तसेच, यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम न्यायनिर्णयानुसार सन २००४ नंतरच्या निवड याद्यांमध्ये बदल झाल्यास, त्यानुसार सदर ज्येष्ठतासूचीमध्ये बदल होईल.

४. सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०५०६१७२७०६१७१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: CN = AVINASH RAJESH ATKAD, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = IELMD
Date: 2026.05.06 17:28:32 +05'30'

**(अविनाश रा. आतकड)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई.

२) अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/ पुणे/ छत्रपती संभाजीनगर/ नागपूर.

३) संबंधित अधीक्षक अभियंता यांना मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई यांच्यामार्फत अग्रेषित. (संबंधित अधीक्षक अभियंता यांच्याकडून कृपया पोच प्राप्त करावी.)

४) अपर मुख्य सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.

५) सह सचिव (ऊर्जा-१) यांचे स्वीय सहाय्यक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) निवडनस्ती (ऊर्जा-१).

परिशिष्ट- अ

शासन परिपत्रक ज्येष्ठता: २०२२/प्र.क्र. १२९/ऊर्जा-१, दिनांक: ६ मे, २०२६ चे सहपत्र

१. संवर्गाचे नांव :- विद्युत निरीक्षणालयामधील अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित)

२. वेतनश्रेणी- अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित) (वेतनश्रेणी : एस-२५, रु. ७८८००- २०९२००)

३. दि.१ जानेवारी, २०२५ रोजीची तात्पुरती सेवा ज्येष्ठतासूची

| अ. क्र . | जेष्ठता क्रमांक | शासकीय कर्मचा-याचे नांव | संबंधीत पदावरील नियुक्तीचा मार्ग | जन्मतारीख | प्रवर्ग | नियम ३ (२)(अ) नुसार संवर्गात प्रत्यक्ष रूजू दिनांक | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठता मानीव दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | १ | श्री. दिनेश ज. खोंडे | सरळसेवेने | ११.०८.१९६८ | अ. जा. | २२.०२.२०११ | २२.०२.२०११ | ३१.०८.२०२६ | एम. ई. (इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टिम) | **कार्यरत** |
| २ | २ | श्री.उदयकुमार ए. भोयर | पदोन्नती | ०४.०७.१९६७ | इ.मा.व | ०२.०७.२०२४ | ०२.०७.२०२४ | ३१.०७.२०२५ | एम.ई. (वि) | **सेवानिवृत्त** |
| ३ | ३ | श्री. हेमंत ना. गांगुर्डे | पदोन्नती | १३.०६.१९७५ | अ.ज. | ०४.०७.२०२४ | ०४.०७.२०२४ | ३०.०६.२०३३ | बी.ई. (वि) | **कार्यरत** |
| ४ | ४ | श्री. अशोक जी. कणसे | पदोन्नती | ०१.०६.१९७० | खुला | २६.०९.०२०२४ | २६.०९.०२०२४ | ३१.०५.२०२८ | बी.ई. (वि) | **कार्यरत** |
| ५ | ५ | श्री.प्रदिप म. चामट | पदोन्नती | २०.०९.१९७० | इ.मा.व. | १५.०९.२०२५ | १५.०९.२०२५ | ३०.०९.२०२८ | बी.ई. (वि) | **कार्यरत** |

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: CN = AVINASH RAJESH ATKAD, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = IELMD
Date: 2026.05.06 17:28:43 +05'30'

(अविनाश रा. आतकड)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन